आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
मंगळवार दिनांक २२ जुलै २०२५

ठळक बातम्या

1. २००६च्या मुंबई लोकल गाडी बॉम्बस्फोट खटल्यात सर्व १२ आरोपींच्या निर्दोष मुक्ततेला राज्य सरकारचं सर्वोच्च न्यायालयात आव्हान.
2. ऑपरेशन सिंदूर आणि बिहारमधलं मतदार याद्या पुनरिक्षण यावर चर्चेसाठी संसदेत विरोधक आक्रमक/ दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब.
3. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गडचिरोली मध्ये लॉयड्स मेटल्सच्या लोहप्रकल्पांचे उद्घाटन, ४० लाख वृक्ष लागवडीचाही शुभारंभ.
4. विदर्भात आज पासून ते 25 जुलै पर्यंत वादळी पर्जन्यमान आणि पावसाचा इशारा.

मुंबई बॉम्बस्फोट

मुंबईत उपनगरी रेल्वेगाड्यांमध्ये २००६ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट खटल्यातल्या सर्व १२ आरोपींना निर्दोष मुक्त करण्याच्या निर्णयाला महाराष्ट्र राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. या प्रकरणावर २४ जुलै रोजी सुनावणी होईल. मुंबईत ११ जुलै २००६ रोजी लोकल गाड्यांमध्ये सात बॉम्बस्फोट झाले होते. या बॉम्बस्फोटांमध्ये १८९ जण मृत्युमुखी पडले, तर ७०० हून अधिक जण जखमी झाले होते. काल झालेल्या सुनावणीत उच्च न्यायालयानं सर्व आरोपींबाबतचा सत्र न्यायालयाचा निकाल रद्द करून त्यांची तातडीनं सुटका करण्याचे आदेश दिले. या घटनेत प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ आणि आरोपींकडून हस्तगत केलेलं साहित्य तसंच, कबुलीजबाब या तिन्ही पातळ्यांवर आरोपींविरुद्धचा एकही गुन्हा सिद्ध करण्यात तपास यंत्रणेला यश आलं नाही असं न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या पीठानं स्पष्ट केलं. या प्रकरणातल्या एकाही साक्षीदाराची साक्ष विश्वसनीय नसल्याचं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं आहे.

संसद

संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे विविध मुद्द्यांवर गदारोळ झाल्यानं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत, नंतर २ वाजेपर्यंत आणि त्यानंतर दिवसभरासाठी स्थगित करावं लागलं. लोकसभेत सभापती ओम बिरला यांनी प्रश्नोत्तरांचा तास सुरु केल्यावर विरोधी पक्ष सदस्यांनी ऑपरेशन सिंदूर आणि बिहारमधलं मतदार याद्यांचं सखोल पुनरिक्षण या विषयांवर चर्चेची मागणी करत घोषणा द्यायला सुरुवात केली. शेती आणि शेतकऱ्यांविषयीचे महत्त्वाचे प्रश्न पटलावर असल्यानं शांतपणे कामकाज चालू द्यावं, असं सभापती बिरला यांनी सदस्यांना सांगितलं. केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांनीही सहकार्याचं आवाहन केलं पण गदारोळ चालूच राहिल्यानं सभागृहाचं कामकाज सभपतींनी १२ वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत स्थगित केलं. त्यानंतरही गदारोळ चालूच राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं. राज्यसभेतही विरोधकांनी बिहारमधलं मतदार याद्याचं सखोल पुनरिक्षण आणि इतर मुद्द्यांवर स्थगनप्रस्तावाची नोटीस दिली होती. मात्र उपाध्यक्ष हरिवंश यांनी ती फेटाळल्याच्या निषेधात विरोधकांनी घोषणाबाजी सुरु केली.

गदारोळामुळे कामकाज आधी १२ वाजेपर्यंत नंतर २ वाजेपर्यंत स्थगित करावं लागलं. नंतरही गदारोळ चालूच राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं.

प्रसारभारती

भविष्यातल्या गरजा पूर्ण करण्याच्या हेतूनं प्रसार भारती आपल्या वृत्तविभागांमध्ये कृत्रीम बुद्धिमत्तेचा वापर करणारी तंत्रं उपयोगात आणणार असल्याची माहिती प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि एशिया पॅसिफिक इन्स्टिट्युट ऑफ ब्रॉडकास्टिंग डेवेलपमेंट जनरल कॉन्फरन्सचे अध्यक्ष गौरव द्विवेदी यांनी दिली. कंबोडियात सिएम रीप इथं सुरू असलेल्या विसाव्या आशिया माध्यम परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. झपाट्यानं विकसित होत असलेलं कृत्रीम बुद्धिमतेचं तंत्रज्ञान, वृत्त आणि प्रसारण उद्योगाचा कायापालट करत असल्याचं त्यांनी नमूद केलं.

*AI powered tools and the distance newsroom master class, I believe will equip our teams to the latest skills for Digital journalism data story telling and ethical reporting. As the media landscape evolves, the principle of Universal access remains at the heart of public service broadcasting in India. Our free Dish platform has brought free high quality television content.*

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस-प्रकल्पांचं उद्घाटन

गडचिरोली इथं विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज झालं. यात एमटीपीए स्टील प्रकल्प, कोनसरी इथलं शंभर खाटांचं रुग्णालय, सीबीएसई शाळेची पायाभरणी, सोमनपल्ली इथं लॉयड्स टाऊनशिप, हेडरी ते कोनसरी स्लरी पाईपलाईन यांचा समावेश आहे. या प्रकल्पांमुळे १४ हजार जणांना रोजगार मिळाला असून, आणखी वीस हजार जणांना रोजगार मिळणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.यामुळे गडचिरोलीचं चित्र पालटलं आहे, गडचिरोलीच्या जल आणि जंगलाचं संगोपन करण्याचा प्रयत्न सरकार करत आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

*आम्ही गडचिरोलीचा वापर वसाहतीसारखा होऊ देणार नाही हे सांगितलं होतं. इथे स्टीलची इको सिस्टम सुरू करतो आहोत पण गडचिरोलीच्या जल जमीन आणि जंगल याचं संवर्धन करण्याच आम्ही ठरवलेल आहे. आणि म्हणून आजपासनं गडचिरोलीमध्ये 1 कोटी वृक्षारोपणाची मोहीम देखील आम्ही सुरू करतो आहोत.*

या कार्यक्रमानंतर गडचिरोली इथल्या कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात ४० लाख वृक्ष लागवड उपक्रमाचा शुभारंभ मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी सहपालकमंत्री आशिष जयस्वाल, आमदार परिणय फुके, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ.मिलिंद नरोटे, पद्मश्री तुलसी मुंडा, लॉयड्स मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी.प्रभाकरन, जिल्हाधिकारी अविशांत पंडा उपस्थित होते.

हवामान

विदर्भात आज पासून ते 25 जुलै पर्यंत वादळी पर्जन्यमान आणि पावसाचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे. आज गडचिरोली जिल्ह्यात मेघगर्जनेसह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून उर्वरित जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान आणि हलक्या पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.  उद्या विदर्भात भंडारा, गोंदिया नागपूर, यवतमाळ जिल्ह्यातील तर परवा 24 जुलै रोजी चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया इथ मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. 25 जुलै रोजी गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यात देखील मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याच आवाहन नागपूरच्या प्रादेशिक विभागातर्फे करण्यात आले आहे. दरम्यान, नागपूर जिल्ह्यात सार्वत्रिक स्वरूपाच्या पावसाची, वादळी वाऱ्याची, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता लक्षात घेता, कृषी रसायनांच्या फवारणीची कामे, उभ्या पिकात खते देण्याची कामे तसेच आंतरमशागतीची कामे पुढील ४ दिवस पुढे ढकलावी, असा सल्ला देण्यात आला आहे.

चर्चासत्र

१८ जुलै २०२५ रोजी नागपूर इथल्या आयकर गुप्तचर आणि गुन्हे अन्वेषण  संचालनालयने गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रांगणात आर्थिक व्यवहारांचे विवरण, अनुपालन आणि ई-पडताळणी योजना, २०२१ या विषयावर जागरूकता चर्चासत्र आयोजित केले. या कार्यक्रमाचा उद्देश रिपोर्टिंग संस्था (आरई) आणि व्यावसायिकांना आयकर कायद्यांतर्गत वैधानिक दायित्वांबद्दल संवेदनशील करणे आणि सुधारित अनुपालनास प्रोत्साहन देणे हा होता.या चर्चासत्रात गडचिरोली जिल्ह्यातील सब-रजिस्ट्रार कार्यालये, सहकारी बँकांचे अधिकारी, व्यापारी संघटना, कर बार असोसिएशनचे सदस्य आणि जीडीसीसी बँकेचे व्यवस्थापक यांचा सक्रिय सहभाग होता. या कार्यक्रमाला सुमारे ५० प्रतिनिधी उपस्थित होते.

धर्मपाल मेश्राम

राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग, संपूर्ण राज्यात अनुसूचित जाती जमातीच्या नागरिकांना न्याय देण्याचे कार्य करीत असल्याचे मत आयोगाचे उपाध्यक्ष ॲड धर्मपाल मेश्राम यांनी आज व्यक्त केले. राज्य अनुसुचित जाती जमाती आयोगातर्फे नागपुरात तक्रार निवारण जनसुनावणी परिषदेच्या  उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या  वाढदिवसाच औचित्य साधून आज पासून म्हणजेच 22 जुलै 2025 ते 22 जुलै 2026 या संपूर्ण वर्षभरात राज्यातील अनुसूचित जाती जमातीच्या प्रलंबित समस्या तत्काळ सोडविण्यासाठी राज्यातील अनुसूचित जाती जमातीच्या 27 आरक्षित विधानसभा मतदारसंघात ही तक्रार निवारण जनसुनावणी परिषद घेतली जाणार आहे.

विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धा

फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत भारताची आंतरराष्ट्रीय मास्टर नागपूरची दिव्या देशमुख हिनं उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत पोहोचलेली ती दुसरी भारतीय महिला खेळाडू ठरली आहे. आता ती अंतिम चारच्या लढतीत आपल्याच देशाची ग्रँड मास्टर कोनेरू हम्पीसोबत सामील झाली असून, उपांत्य

फेरीत दिव्याचा सामना चीनच्या ग्रँड मास्टर तानझोंगीशी होणार आहे. तर आज संध्याकाळी हम्पीचा सामना दुसरी चिनी ग्रँड मास्टर लेई टिंगजी हिच्याशी होणार आहे.

रक्तदान

आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त गोंदिया जिल्ह्यामध्ये भारतीय जनता पार्टीच्या वतीने 14 ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलं. या रक्तदान शिबिरामध्ये जवळ जवळ 1000 लोकांनी रक्तदान केले असून हा आकडा आणखी वाढणार असल्याची माहिती भाजपच्या गोंदिया जिल्हाध्यक्ष सीता रहांगडाले यांनी दिली आहे.

अजित पवार वाढदिवस

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या 65व्या वाढदिवसानिमित्त यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील 65 जिल्हा परिषद शाळांमध्ये वृक्षारोपण करण्याचा नावीन्यपूर्ण उपक्रम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. या अंतर्गत शाळांमध्ये वड, पिंपळ, लिंब, करंज यांसारख्या निसर्गोपयोगी वृक्षांची लागवड करत पर्यावरण संवर्धनाचा महत्वपूर्ण संदेश देण्यात आला.

रोजगार मेळा

जिल्हयातील उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नागपूर, मॉडेल करिअर सेंटर, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर जिल्हयात तीन ठिकाणी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. कामठीच्या दादासाहेब कुंभारे मल्टीपर्पज ट्रेनिंग इन्स्टिट्युट, ड्रॅगन पॅलेस कॅम्पस येथे करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्यने उमेदवारांची निवड झाल्याची माहिती आहे.

*****